म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १६५८
१६६३

REFBK-0013480
REFBK-0013480

# रणगर्जना



भारतीय कवींचा प्रातिनिधिक कवितासंग्रह

भारतीय कवींचा

प्रातिनिधिक कवितासंग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नोंद दि: ........

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 38364 वि: 91001
क्रमांक 9645 नोंद दि: 23.3.64

प्रस्तावना :

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

93840

REFBK-0013480

REFBK-0013480

# रणगर्जना

किंमत ५० पैसे

२० ऑक्टोबर १९६२ रोजी चीनने भारताच्या उत्तर सीमेवर आक्रमण केले. त्या दिवशी भारताच्या इतिहासात एक नवा कालखंड सुरू झाला. चीनने केलेले हे आक्रमण म्हणजे आपल्या पौरुषाला आव्हान आहे अशी भारतीय जनतेची भावना होती व आहे. या भावनेचा प्रखर, ओजस्वी उद्रेक भारतीय कवींच्या कवनांमधून शब्दरूप घेऊन प्रकट झाला. ही कवने भारतीय जनतेची नेहमीच स्फूर्तिस्थान ठरणार आहेत.

आकाशवाणीने भारतीय भाषांतील मान्यवर कवींचे एक संमेलन २५ जानेवारी १९६३ रोजी आपल्या दिल्ली केंद्रावर भरविले होते. या प्रसंगी त्यांनी गायिलेल्या कवितांचे मराठी अनुवाद महाराष्ट्रातील नामवंत कवींनी केले आहेत, ते आकाशवाणीच्या संमतीने आणि सहकार्याने या संग्रहात प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धी संचालनालयातर्फे प्रकाशित

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
मुंबई

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ...
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों. दि: ........

# प्र स्ता व ना

हा कवितासंग्रह प्रसंगनिष्ठ आहे. भारतावर चीनचे विश्वासघातकी आक्रमण झाल्यानंतरच्या संतप्त वातावरणात निर्माण झालेल्या या कविता आहेत. मौलाना अन्वर साब्री यांनी म्हटल्याप्रमाणे 'धगधगती बर्फात निखारे' अशा या कविता आहेत. या पंक्तीतून अनेक श्लेष निघतात; त्यातील एक श्लेष म्हणजे येथे विश्वशांतीवरील श्रद्धा निःशंक रीतीने बर्फाप्रमाणे शांतरूपात नांदत होती. त्यात हे आक्रमणाचे निखारे उद्भवले व फुलले. येथे योगेश्वर शंकराची ध्यानमुद्रा भारताच्या मुखावर स्तिमितपणे शोभत होती. तिला तांडव नृत्यात दंग झालेल्या रुद्राच्या भीषण मुद्रेचे रूप यावे म्हणून कवींनी आवाहन दिले आहे. शत्रू 'वकधर्मी' हलाहल कुंभच अशी जाणीव भारताला झाली; ही जाणीव या कवितांचे अंतरंग आहे. परचक्राचा प्रतिकार करणारी प्रेरणा हा या सर्व कवितांचा साधारण स्थायीभाव आहे.

या स्थायीभावाचा आधारभूत दृढसंस्कार म्हणजे भारताची अस्मिता होय. या अस्मितेचे रूप विश्वमानवाकडे ओढ घेणारी परंतु भारताच्या भौगोलिक सीमेत काठोकाठ भरून स्फुरण पावणारी राष्ट्रीय आत्मनिष्ठा होय. भारताची राष्ट्रीयता विश्वशांतीच्या ध्येयाची अग्निरूपाधिक उपासना करणारी आहे. या पार्श्वभूमीवर चीनचे आक्रमण हे जागतिक मानवतेवरचे संकट आहे, अशी नैतिक धारणेची ग्वाही या कविता जगाला देत आहेत. चीनने केलेला विश्वासघात ही केवळ भारताची प्रतारणा नसून ही मानवतेला कायमची धोक्यात ठेवणारी आसुरी शक्ती आहे; अशी सूचकता या कवितांमधून भरून राहिली आहे. ही रणगीते म्हणजेच रणगर्जना; परंतु परदेशावर अतिक्रमण करावे अशा उद्देशाचा पापस्पर्श यत्किंचितही भारतीय भावनेला नाही; परकीय प्रदेशाच्या अणुमात्र भागाचाही लोभ आमच्या प्रदीर्घ इतिहासाला माहीत नाही; परकीय प्रदेशावरील अतिक्रमणाची कथा भारताच्या इतिहासाने कधीही सांगितली नाही. म्हणूनच विशेषतः आधुनिक युगाला शांतीचा अध्यात्मवादी संदेश देण्याचा अधिकार भारतास प्राप्त झाला आहे. तो अधिकार म. गांधींच्या रूपाने मूर्त व प्रकट झाला. 'मानवतेचा प्रशांत सागर' म्हणजेच भारत; अशीच मानवजात बनावी असा परम पवित्र संदेश देणारी

अध्यात्मशक्ती भारतापाशी आहे, असे हेम बारूआसारखे कवी आत्मविश्वासाने सांगत आहेत: "शक्ति आमुची तीच अलौकिक. सीमेवर जी प्राणपणाने लढणा यांच्या उरांत स्फुरते".

या कवितासंग्रहात भारतातील बहुतेक सर्व महत्त्वाच्या भाषांतील कवितांचा संग्रह केला आहे. आसामी, बंगाली, उडिया, उर्दू, काश्मिरी, हिंदी, गुजराथी, पंजाबी, कन्नड, तामिळ, मल्याळी, तेलगु, मराठी या भारतीय मुख्य भाषा यांत समाविष्ट झाल्या आहेत.

आसामातील कवी हेम बारूआ यांची 'देश आमुचा' ही विचार-प्रधान कविता प्रारंभी दिल्यामुळे या कवितासंग्रहाची मूळ वैचारिक बैठक सखोल बनविली आहे. या कवितेतील शेवटचे कडवे या वचारिक बैठकीला तीव्र प्रक्षोभाचे रौद्र भयानक रूप देते, त्यामुळे ही कविता अत्यंत अस्सल ठरते. आधुनिक काव्यातील अंतर्मुख चिंतनाची प्रथा प्रातिनिधिक स्वरूपात व्यक्त करणारी बंगालीतील 'कुणा कवीस' ही कविता होय. या कवितेने रणगर्जनेला अंतर्मुख बनविले आहे; शब्दसृष्टीच्या पढीकतेची मर्यादा या कवितेने पुसली आहे; शब्दाच्या पलीकडे असलेल्या चिन्मय अशा विलक्षण प्राणकलेचा क्षोभ यात ध्वनित होतो. अंतर्मुखतेतून बाहेर ओढन शस्त्र-संनद्ध करणारी शक्ती म्हणजे दिनकर कवीचा 'शिपायाचा संकल्प' होय. भाषेचा उसळता उच्छृंखल प्रवाह म्हणजे ही कविता होय. बलदंड भगतसिंगच्या आकांक्षा, क्रांतीकाळातल्या पेटलेल्या रक्तरंगी ज्वाळा; ह्या कवितेतून नेत्रास दिपवीत आहेत. "शौर्य कोमल नसते, कराल असते", तो "वीरतेचा वैश्वानरच" भडकलेला या कवितेत गर्जत आहे. धर्माच्या लपलेल्या ऋद्धीसिद्धी रणांगणातील मरणातून प्रकट होतात, असे 'विजयवचन' मुक्तकंठाने दिनकराची कविता देत आहे. या कवितासंग्रहातील मूळ कवी व अनुवादक या सर्वांना धन्यवाद! परंतु मूळ ते मूळ, अनुवाद तो अनुवाद.

वाई:
तारीख २१-११-१९६३

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

पान

# अनुक्रमणिका :


शंकर-अर्जुन युद्ध १
महाकवि भारवि
अनु. : गोपीनाथ तळवलकर

देश आमुचा ३
हेम बारूआ
अनु. : शांता शेळके

आव्हान ६
नित्यानंद महापात्र
अनु. : मंगेश पाडगांवकर

माझा प्रिय देश ७
मौलाना अन्वर साबरी
अनु. : यशवंत कानिटकर

पुरुषसूक्त ८
शिवरूद्रप्पा
अनु. : गणेश पाठक

मार्ग आमुचा ९
दीनानाथ नादिम
अनु. : यशवंत

आज हिमालय जागे रे १५
भानुशंकर व्यास
अनु. : भवानीशंकर पंडित

आवाहन १७
कोथ्थामंगलम् सुब्बु
अनु. : सरिता पदकी

पान

उद्‌बोधन २१

विश्वनाथ सत्यनारायण

अनु. : संजीवनी मराठे

दुर्गंध २२

अमृता प्रीतम

अनु. : वसंत वऱ्हाडपांडे

पीतज्वर २४

ओलप्पमन्ना सुब्रमण्यम नंबुद्रीपाद

अनु. : म. ना. सरपटवार

कुणा कवीस २९

कविता सिन्हा

अनु. : अनुराधा पोतदार

शिपायाचा संकल्प ३९

रामधारी सिंह 'दिनकर'

अनु. : ग. दि. माडगूळकर

देशवासियांना पत्र ४४

शिवमंगल सिंह 'सुमन'

अनु. : ग. दि. माडगूळकर

बाळमूठ वज्रघाव ४९

वसंत बापट

• • •

# शंकर-अर्जुन युध्द

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ............... दि: ...............
क्रमांक ............... नों. दि. ...............

महाकवि भारवि

मराठी अनुवाद : गोपीनाथ तळवलकर

येति गुहांतुनि चंड प्रतिध्वनि
प्रबळ धनूंच्या टंकारांचे
त्या नादानें कंपित जणुं कीं
होई हृदय विदीर्ण दिशांचें १

तुफान होता वेग शरांचा
त्रस्त तयाने हो शिवसेना
ग्रीष्म ऋतूंतिल वावटळीनें
भूवर जैशी धूळ ठरेना २

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

कुपित पार्थ तो शोभत होता
आंत पेटल्या क्रोधाग्नीनें
भासे तो कीं भव्य हिमालय
जणूं पेटला दावाग्नीनें

पावकास्त्र सोडून झाकिलें
कौंतेयानें रविकरजाला
दगड पेटती, होति भस्मसात्
त्यांचा भीषण नाद जहाला ४

पडे हरावर अग्निबाण तों
ज्वालामय हो सारी सृष्टि
अभिमंत्रुनि वरुणास्त्र पिनाकी
दहा दिशांना करि जलवृष्टि ५

सरसावे तो माज बांधुनी
तुंबळ संग्रामास किरीटी
महानागसा क्रुद्ध वीर तो
गरलापरि ये पाणी नेत्रीं ६

शंकर अर्जुन यांचे होते
वज्रापरि ते कर भिडलेले
मुष्टिघात होतांच गुहातुन
निनाद घुमले, भूघर फुटले ७

सह्यगिरीपरि विशाल भक्कम
शिवदेवाची सुधीर छाती
भरतीच्या लाटेपरि धडके
सतत त्यावरी अर्जुन मुष्टि ८

भुजबलगर्वित शंकर-अर्जुन
दंड थोपटुन स्वारी भरती
चंड तयांच्या आघातांनी
पर्वतशिखरें डगमग करती ९

● ● ●

# देश आमुचा

मूळ आसामी कविता : हेम बारूआ
अनुवाद : शांता शेळके

देश आमुचा –

शतशतकांच्या इतिहासाचे लंघुनि सेतु
दीप्ति जयाची आठवणींना अजुन उजळते
शंख फुंकुनी घुमवित येते
दिशादिशांना, पर्वत शिखरा
करी जीवनासंगे हितगुज होउनि मुखरा
अजुन ऐकतो मंद्र ध्वनि तो पडतो कानीं
घुमती गाणीं
कोटि कोटि हृदयांतुन अविरत
गुंजत राहे स्वर तो शाश्वत
जीवन ज्योति विझते केव्हां, केव्हां जळते
दिपते–लपते
स्वतंत्रतेचे स्वप्न अंतरी अजुनी जपते . .

देश आमुचा –
मुक्त वाहते नित्य जिथे ज्योतिर्मय धारा
सुवर्ण तेजे झळझळणारी
लवथवती ज्ञानाची ज्वाला
युगायुगांतुन स्नात इथे इतिहास मानवी
हांसत राहे निर्भर होउन आत्मगौरवीं . .

गगनचुंबि अतिभव्य स्वप्नसा
उभा ठाकला धवल हिमाचल
उर भेदुन पाषाणी ज्याचे वाहत येती
ब्रह्मपुत्र अन् सिंधु गंगा
सरिता निर्मल . .

तट कालाचे भिजवित येती
जलप्रवाहीं ज्यांच्या नाहुनि
देश आमुचा झळकत राहे रत्नमण्याहुनि
इथेंच आम्हीं उभवूं फिरुनी स्वर्णमन्दिरे
ताज आमुच्या स्वप्नांचेहि—
स्वप्नाहुन जे निर्मळ गहिरे . .

देश आमुचा –

मानवतेचा विशाल सागर
तीरावरती पावुनि जागर
नित्य नव्या छन्दांत गुंफुनी
मधु जीवन जयराग गातसू इथें निरन्तर
ज्या रागाच्या स्वरास्वराच्या झंकारांतुन ये कल्लोलत
मानवहृदया करीत जागृत
हृदयाहृदयांतून उमटले स्पन्दन अद्‌भुत . .

देश आमुचा –

हाच आणखी याच आमुच्या सरिता पावन
पावन त्यांच्या जळांत नाहुन
असीमतेची सीमा दावी ती ज्ञानाची उषा उदेली
तीरावरती निथळत आली
ब्रह्मज्योति ही इथे जागवी
तेजोमय ज्या आरुण किरणीं
स्नात होउनी
मानव आत्मा वरितो मुक्ति
आणि मेळवी अपूर्व शक्ति
परिसमणी तो स्वर्ण करितसे लोहाचेंही
कोटि चन्द्र अन् कोटि सूर्यही
इथे उगवले, याच धरेवर
आणि नांदला मानवतेचा प्रशान्त सागर
शक्ति आमुची अशी अलौकिक
मरणाच्याही सीमेवर ती
शान्त आमुच्या नयनीं हंसते
सणसणुनी ती सुटतां गोळी

झेलायास्तव हांसत हांसत
वक्ष आपुले उघडे करिते
शूलावरही चढतां चढतां
लक्ष लक्ष सोनेरी स्वप्नें
भंवतीं रचिते
शक्ति आमुची तीच अलौकिक
सीमेवरती प्राणपणाने लढणारांच्या उरांत स्फुरते

देश आमुचा –
इथें जीवनीं अविरत जळते सघन ज्वाला
आणिक धरिते अमृतत्वाचा अधरीं प्याला
याच परन्तू
प्रशान्त मानव महासागरावरती जेव्हां भरती येते
इथेच तेव्हां—
रक्ताचीही घोर तृषा अनिवार भडकते
रक्ताचीही घोर तृषा अविराम भडकते



# आव्हान

मूळ उडिया कविता : नित्यानंद महापात्र

अनुवाद : मंगेश पाडगांवकर

घालीतसे हांक जवानांचे रक्त, अरे अरे देशभक्त
मागतो हा क्षण सर्वस्व-अर्पण प्राणांची सज्जता फक्त

कैलासाची कक्षा पहा अडवून दक्षाने मांडिला याग
अपमान होय शिवाचा, सतीने केला शरीराचा त्याग

जाग जाग आता अरे योगेश्वरा सोडून ध्यानाची मुद्रा
प्रलयाचें शिंग येई रे फुंकित नाचत तांडव रुद्रा

हीन अजगर हिमालय-शिरीं चढून उत्पात करी
आतां भोलानाथ हरहर शिव घ्या हो पाशुपत करीं

बकधर्मी शत्रु पुटपुटे मंत्र हलाहल विष उरीं
साम्यवादाचा हा करीत प्रचार अघोर हिंसा करी

घोषित डमरु पिनाकपाणी नीलकंठा पुढे सरा
विश्वासघातकी शत्रूच्या उरीं त्रिशूळाचा घाव करा

वाहून जाऊं द्या दूषित हे रक्त धुवून जाऊं द्या पाप
गौरीशंकराच्या शिखरावरती तुझे धर्मचक्र स्थाप

● ● ●

# माझा प्रिय देश

मूळ उर्दू कविता : मौलाना अन्वर साबरी
अनुवाद : यशवंत कानिटकर

प्रिय असशी तूं भारत देशा मजला प्राणाहुनी
स्वर्गोपम सौंदर्य विराजे तुझ्या कणांमधुनी

हिमालयाचे भाल चुंबितो त्रिभुवनदीप रवी
देवतांतरी शुभभावांचे यौवनधन जागवी

गिरीदरींतुन तुझ्या प्रगटती लावण्याच्या खनी
तुलसीदासकृत चौपाया जणु शोभति रामायणीं

काशीमधली प्रभातवेला शुचिता जणु मेरिची
पुण्य उपायन समर्पिती तिज चरिते संतमुनींची

तुझ्या फुलांमधि रसगंधाचे रंगांचे उल्लास
रवींद्र प्रतिभेचेच असति जणु नित्य नवे उन्मेष

तुझ्या कुशीमधि मुखकमलाचे फुलति किती ताटवे
मनुजरुप धारिणी गजल जशि शोभे गालिब सवे

दंवसंकुल वक्षावर तुझिया मणि मौक्तिक मंडले
स्वर्गंगेनें तुझ्या मस्तकी चंदन जणू र्चचिले

आत्म्याचे हो दिव्यारोहण अशी तुझी मोहिनी
जीवन सरगम नित्य रचितसे नव्या रागरागिणी

कलाविदांनी तुझ्या बांधिले सुंदर ताजमहाल
चकित लोचनीं देत खंडणी अजुन त्यास दिक्काल

आपत्काली युद्धपरायण होशी तूं रणगाजी
धगधगती बर्फांत निखारे, करु शत्रूवर बाजी

हे शूरांच्या देशा निस्तुल धैर्याची तू खाण
कार्यज्योत निष्कंप तेवते घुमते जरी तुफान

परचक्राचे करु निर्दाळण, उडवू दाणादाण
बुडवाया जो येईल त्याचे होत इथे शिरकाण

# पुरुषसूक्त

मूळ कन्नड कविता : शिवरुद्रप्पा
अनुवाद : गणेश पाठक

सहस्राक्ष हे, सहस्रपाणे सहस्रपादा सहस्रशीर्षा
सहस्र हृदयीं स्थिर एकच तूं विश्वात्मक नवभारत पुरुषा

पायतळी तवसागर गर्जित हिमशिखरांचे शिरी विभूषण
देही जनपद विविध नाडिका एक हृदय अन् एकच स्पंदन

स्पर्श कराचा होता शिखरी खळखळ वाहत गंगा उतरे
श्वास सुगंधे तुमच्या होते चिन्मिय माती, स्तन्य पाझरे

दृष्टि उजळते सहस्र दीपां श्रद्धा करुणा प्रीत घरोघर
धन तिमिरी पण अजुन तळपते मंत्र-वाणिचे नक्षत्राक्षर

चंद्र किरण तव स्पर्शामधुनी अंकुरता ध्वनिलहरी गायन
स्फूर्ति कवीते, मुखरित वीणा स्वर संवादी तानपुऱ्यातुन

भ्रुभंगे तव प्रलयकारी राज्यक्रान्तिची लाट उसळते
दिगंत कीर्ती इतिहासाच्या पानोपानी तुझी गाजते

गिरिकंदर घन नादे घुमती युगायुगाची चळते निद्रा
कल्लोलिनिचा ओघ अडाया तव दृष्टीचा पुरे इशारा

प्रपातांत तव हास्य निनादे स्मिततेजांकित दीप मनोहर
नभोवाणिचे नादब्रह्म तू पदी जगाच्या तुझेच नूपुर

यंत्रयुगाच्या जयजयकारी पुरुषार्थाचा तुझ्या तराणा
तुझ्या स्फूर्तिने अखंड चाले विज्ञानाची मौन साधना

तुझ्याच इच्छाशक्तीमधुनी कालचक्र घे नित्य चेतना
देश रक्षणा दक्षताहि तूं ऋतुचक्राची तूंच प्रेरणा

सहस्राक्ष हे, सहस्रपाणे सहस्रपादा सहस्रशीर्षा
सहस्र हृदयीं स्थिर एकच तूं विश्वात्मक नवभारत पुरुषा

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........ वि:
क्रमांक ........ नों दि.
नों. दि. ........

# मार्ग आमुचा

मूळ कविता काश्मिरी : दीनानाथ नादिम
अनुवाद : यशवंत

१ ही असे आमुची प्रिय भूमी
कुसुमाच्छादित आसमंत हा
शांतिदेविचे माहेरचि हें . .

चिनार तरुच्या शीतल छाया
प्रीतिकुंज जणुं थाटलेत हे . .
पार्थ-धनुर्धर वीर प्रसवा
असे आमुची ही प्रिय भूमी
प्रीति, जिव्हाळा समूर्त ऐशा
गौतम बुद्धाची भू-जननी
ती ही अमुची पावन भूमी

महजूर कवीची कर्मभूमि जी पुण्यमयी . .
तो हा काश्मिर प्यार अम्हां
कनवाळूपण अथांग अंतःकरणीं
उदात्त सात्विक सौंदर्याची वाणी
कवींद्र जो का रवींद्र ठाकुर वंगभूमिचा मुकुटमणी
असा सत्य-शिव-सौंदर्याचा मार्ग आमुचा
पुण्य भूमि ही प्रिय अमुची.

२ ही असे आमुची प्रिय भूमी
जाऊन नदीवर आली अंग धुवून
निथळती वितस्ता जलकण भिवयामधुन
ती माय माउली 'सारा' वृद्धा धूता
जोडून हात "विनविते प्रभो, भगवंता,

ही धरा सुंदरा – तिचा तूंच नियंता
जन सुष्ट दुष्ट – परि तूच बुद्धिचा दाता
कल्याण करी ह्या सकलांचें, तूं त्राता"

हा हिंदु मुस्लिम – भेद भाव कटु असला
शिकवणीत जीच्या कधि न कुणा आढळला

सकलांस वंद्य ती महंत साध्वी लल्ला
यापरी असे हा मार्ग आमुचा घडला
प्रिय भूमि आमुची जीव हिच्यावर जडला

३ ही असे आमुची प्रिय भूमी
करीम कोणी बुढ्ढा धीवर
बसून वुल्लरच्या काठावर
'किती पसरले तरी दूरवर'!
करतो कौतुक बघत सरोवर.

तोंच अचानक सुटून वारा
त्यावर वादळ लाटा उठती
दूर एकली नौका तिजला
झोंबु लागती, गिळूं पाहती.
करीम घेई उडी तत्क्षणी
वाऱ्यापरि चालला सरासर
'बुडूं देउं का नौका प्रळयीं?'
म्हणतो, 'मेलो तरि बेहत्तर!'
आणि आश्रया कपोत येतां
तयास देउन अभय, आपुले
मांस अर्पितो शिबी भूपती
सान थोर यापरी येथले

हा किस्सा, हा मार्ग आमुचा
विश्वात्मकता अशी आमुची
पुण्यभूमि ही प्रिय अमुची

४ ही असे आमुची प्रिय भूमि

बालबालिका शाळेंतून ह्या आल्या दौडत
जणु पाकळ्या गुलाबाच्या कीं रसरशीत
नसानसांत त्यांच्या खेळे जे लाल रुधिर
द्याया सहर्ष उभ्या रांगेत झाल्या अधिर
'घायाळ झाले जवान रणीं त्यांचियासाठीं
हवें तितुके काढून घ्या कीं,' प्रेमें म्हणती
'विटाळलेली परकीयांच्या आक्रमणानें'--
म्हणती 'भूमि शुद्ध आमुच्या होवो रक्तानें'
चौदा गोळयांनीं विच्छिन्न झाला जयाचा देह
शीरवानी तो झाला अमर, नाही संदेह.

शौर्याचा हा मार्ग आमुचा
वीरप्रसु ही अमुची भूमी
हीच आमुची प्रिय भूमी

५ ही असे आमुची प्रिय भूमि

ग्रीक देव – त्यापरी भव्यतनु भूमिपुत्र हा उभा
चर्येवर ज्याचिया विराजे विमल उषेची प्रभा
डोंगर माथ्यावरुनि बघे समभावे दोहीकडे
इकडे 'दर्गा' तिकडे 'हरमुख' शैलशिखर तें खडें
खांद्यावरुनी माठ आणतो ताकाची तरुतळी
तृषार्त पांथा पीयुष पुरवी भरभरुनी ओंजळी
वाहति गंगा – वितस्ताच जणु अखंड तीर्थापगा
विद्यासंतर्पण कीं चाले लोभस ऋषिचे जगा

ह्या धर्मांचा मार्ग आमुचा
सेवाव्रतरत अमुची भूमी
हीच आमुची प्रिय भूमि

६ ही असे आमुची प्रिय भूमि

ही अकिंचनांची धनहीनांची दुनिया
दैन्यांत बुडाल्या रिक्तांची ही दुनिया.
या भुकेजल्यांच्या कोरड पडली ओठीं

परि नेत्रीं विलसे प्रेमळतेची दीप्ती.
हा उच्च, नीच हा, भेद न ठावा चित्तीं
समभाव-दृष्टि ही धरती सर्वाभूतीं
क्षतविव्हल कुष्टां हस्तस्पर्श जयांचा
चंदनी उटीपरि सुखकर शीतल साचा
अवतीर्ण होतसे काय पुन्हा उपगुप्त
चेतविती जनता – जी दगडापरि सुप्त
चारित्र्य ह्यापरी बापूजींचें थोर
जणुं नित्य तेवतो साक्षात् दीप समोर

हाच असे हो मार्ग आमुचा
असे यापरी अमुची दुनिया
हीच आमुची प्रिय भूमि

७ ही असे आमुची प्रिय भूमि

जणुं शांता दुर्गा पहा लडाखी माता
एकुलत्या एका अपुल्या पुत्रा
दिला बळी रणवेदीवरती
ढळली तिळहि न परंतु चित्तीं.

खंत करी ती उलट मानसी—
‘नसे पुत्र कीं आणिक मजसी’!
तिच्या लोचनीं सागर खवळे
आणि अंतरीं आग उफाळे
म्हणे – “समजतां का अबला मज?

प्रहार रिपुचे वक्षी झेलुन
हिमालयाचे करीन रक्षण
कळीकाळासहि धरीन रोधुन.

पराभूत करि यमधर्मा जी
सावित्रीची त्या मी वंशज!”

असाच आहे मार्ग आमुचा—
खाण अलौकिक अशा सतींची ही भूमि
असे आमुची ही प्रिय भूमि

८ ही असे आमुची प्रिय भूमि
शत रिपु-सैनिक
तोंड तयाशीं एकटाच हा जवान देई !
क्षत–शत–विव्हल
देह जाहला, हात पाय तर गळून पडले !
तरीहि त्याची अभंग हिंमत.
म्हणे आपुल्या सवंगड्यांना–
"मरण शेवटी अटळचि आहे !
परंतु बदला उद्या शत्रुचा घ्याच पुरेपुर !
भूमातेच्या अश्रूसरींतील
थेंबा-थेंबागणिक सुटूं द्या
गोळ्या तुमच्या कडाबिनींतुनि."
चक्रव्यूहा भेदायाला
घुसे पोर अभिमन्यु कोवळा.
तोच असे हा मार्ग आमुचा
तशीच अमुची निधडी छाती
ह्या अमुच्या प्रिय भूमीसाठीं

९ ही असे आमुची प्रिय भूमी.
आणि पहा हो हें तुमचें जग !
तुमच्या जगतीं सहानुभूति केवळ वरवर ओठीं
द्वेषाच्या परि हलाहलाचे भरले रांजण पोटीं
असे सुसंगत अमुची उक्ती, करणी, विचारसरणी
तुमची भाषा फसवी, आणिक हृदय विषाची बरणी
नसे आंत बाहेर, खुली ही अमुची निर्मल रीती
'छिनुन दुजांचें करुं गिळंकृत', ही तर तुमची नीती
माजविणे बेदिली, पेरुनी विसंवाद सर्वत्र
जगांत तुमच्या गढूळ अवघे जीवित–सरिता पात्र
सर्वस्वाचा होम कराया अम्ही न पाहू मागें
जगांत अमुच्या अम्ही साधतों समृद्धी अनुरागें.
ऐसा आहे मार्ग आमुचा
अशी आमुची प्रिय भूमी.

१० ही असे आमुची प्रिय भूमी
थांबा, ऐका एकच आता गोष्ट.
सूवर्ण-भू, ही होती पूर्वी
तसेंच निश्चित हिचें भविष्यहि स्पष्ट.
संत-महात्मे-शककर्त्यांची जननी
कुणी तपोनिधि, कुणी जगाच्या
कल्याणास्तव अपार केले कष्ट.
परंपरा ही अवतारांची दिव्य जेथली
तिची करावी सहजी कोणी काय कुचाळी ?
सागर आहे प्रशांत सांप्रत
प्रक्षोभें परि उठतां गर्जत
सत्याच्या प्रळयंकर लाटा
टाकतील उलथून क्षणार्धी
देतिल भिर्कावुनी तुम्हाला
हिमाद्रिच्या पलिकडे लीलया
एकमेव हा मार्ग आमुचा..
ही आहे प्रिय भूमि अमुची.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........ वि: ........
नों. दि. ........

# आज हिमालय जागे रे

मूळ गुजराती कविता : भानुशंकर व्यास
अनुवाद : भवानीशंकर श्री. पंडित

भरतभूमिची हाक ऐकुनी
आज हिमालय जागे रे !
जाग येउनी उठे हिमालय
खडबडुनी तो जागे रे !
आज हिमालय जागे रे
आज हिमालय जागे रे !
रणीं रमे रणशूर, भ्याड पण—
पळे दूरवर मागे रे
आज हिमालय जागे रे १

डमडम डमडम वाजे पडघम
त्यांत 'काळ-लय' लागे रे !
गर्जे कर्णा, "अरीस हाणा"
कपाल भरुनी मागे रे !
कपाल भरुनी 'रक्त' पाहिजे
बळि द्याया व्हा आगें रे !
आज हिमालय जागे रे २

हिमाचलस्थित परंपरागत
संस्कृति धारा सांगे रे !
वाहत वाहत ती अव्याहत
सुचवितसे निज ओघें रे !
"उठा, तरुण हो, शिर घ्या करिं हो
चिरंजीव व्हा अवघे रे !" !
आज हिमालय जागे रे ३

शेष थरथरे मुखि फुत्कारें
पाण्यावर आवेगें रे !
कैलासेश्वर उघडि भयंकर–
तृतीय लोचन रागें रे !
डमडम डमडम डमरु वाजवी
बम् बम् बम् बम् शिंग गाजवी
तांडव रंगीं रंगे रे !
त्रिशूलपाणी त्रिशूल हाणी
संहारी अरि वेगें रे !
अनंत शतकें सुप्त जो सुखें
आज हिमालय जागे रे
आज हिमालय जागे रे ४

"ऊठ, अर्जुना ! तोंड दे रणा
'सत्यांस्तव त्यज संगे रे' !
संहारास्तव अवसर वास्तव
अघ न शिवे तुज सांगे रे" !
हें कृष्णाचें हितवच साचें
ये गीतेच्या मार्गें रे !
प्रतिध्वनित हो पुन्हा तेंच ते
तेंच हिमालय गुंगे रे
आज हिमालय जागें रे ५

आज हिमालय जागे रे
आज हिमालय जागे रे
आज हिमालय जागे रे !

# आवाहन

मूळ तामिळ कविता : **कोथ्थमंगलम् सुब्बु**
अनुवाद : **सरिता पदकी**

धनुष्य माझें आज हवें मज
विजयघंटिका निनादविणारें
विकट दुंदुभीरव उमटूं दे
धुळींत रिपुला लोळविणारे
रणभूषेनें सजवा वीरां
जययात्री प्रस्थान निघूं दे
सुरसेनानी कार्तिकेय हे
आण तुझ्या विजयी भाल्यांची
नीलकण्ठ! हो उभा पाठिशीं
आण तुझ्या तुज शिवशूलाची

या नभचुम्बी गोपुरमाला
हा पवित्र व्यंकट धरणीधर
धवलयशा गंगा, कावेरी
रंगनाथ श्री नटराज तसा
तिरुचेंदुरचा श्रीशिवराज
अक्षय कन्याकुमारिका अन्
गर्भी श्रवलेले ऋग्राज
या साऱ्यांची शपथ, शपथ कीं
आक्रमीत धर्माचा सत्पथ
अमर समर हें झुंजूं झुंजूं
हांसत अर्पू प्राण जयाप्रत!

शेष थरथरे मुखि फुत्कारें
पाप्यावर आवेगें रे !
कैलासेश्वर उघडि भयंकर–
तृतीय लोचन रागें रे !
डमडम डमडम डमरु वाजवी
बम् बम् बम् बम् शिंग गाजवी
तांडव रंगीं रंगे रे !
त्रिशूलपाणी त्रिशूल हाणी
संहारी अरि वेगें रे !
अनंत शतकें सुप्त जो सुखें
आज हिमालय जागे रे
आज हिमालय जागे रे ४

"ऊठ, अर्जुना ! तोंड दे रणा
'सत्यांस्तव त्यज संगे रे' !
संहारास्तव अवसर वास्तव
अघ न शिवे तुज सांगे रे" !
हें कृष्णाचें हितवच साचें
ये गीतेच्या मार्गें रे !
प्रतिध्वनित हो पुन्हा तेंच ते
तेंच हिमालय गुंगे रे
आज हिमालय जागें रे ५

आज हिमालय जागे रे
आज हिमालय जागे रे
आज हिमालय जागे रे !

# आवाहन

मूळ तामिळ कविता : **कोथ्थमंगलम् सुब्बु**
अनुवाद : **सरिता पदकी**

धनुष्य माझें आज हवें मज
विजयघंटिका निनादविणारें

विकट दुंदुभीरव उमटूं दे
धुळींत रिपुला लोळविणारे

रणभूषेनें सजवा वीरां
जययात्री प्रस्थान निघूं दे

सुरसेनानी कार्तिकेय हे
आण तुझ्या विजयी भाल्यांची

नीलकण्ठ ! हो उभा पाठिशीं
आण तुझ्या तुज शिवशूलाची

या नभचुम्बी गोपुरमाला
हा पवित्र व्यंकट धरणीधर

धवलयशा गंगा, कावेरी
रंगनाथ श्री नटराज तसा

तिरुचेंदुरचा श्रीशिवराज
अक्षय कन्याकुमारिका अन्

गर्भी श्रवलेले ऋग्राज
या साऱ्यांची शपथ, शपथ कीं

आक्रमीत धर्माचा सत्पथ
अमर समर हें झुंजूं झुंजूं

हांसत अर्पू प्राण जयाप्रत !

साक्ष आमच्या देवभक्तिची
साक्ष मंदिरांच्या प्रीतीची
महाभारतावरच्या शाश्वत
अन्तरांतल्या दृढ निष्ठेची
अमरसमर हें झुंजू झुंजू
हांसत अर्पू प्राण जयाप्रत !

अहो आमुच्या वीरबन्धुनों
हिमालयाच्या दुर्गम मार्गी
चढलां लढलां जे प्राणान्तिक
दाट धुक्यामधि अडखळतांही
नच ढळलां जे मार्गावरुनी
राहिलांत कष्टानें उचलत
निर्धारें हिमदष्ट पाउलें
पेलित बंदुक खांद्यावरतीं
हिमालयाच्या दुर्गम पंथीं
चाललां तुम्ही वीर बन्धुनों !
स्वातंत्र्यास्तव बापूसंगें
लढले जे जे त्यांची त्यांची
शपथ घेउनी वचन देतसें
विजय मिळेतों वर्ज्य अम्हांला
सौख्य, चैन, आराम मिजाशी
कोटिकोटि आहोंत पाठिशीं
तुमच्या आम्ही रणमर्दानों !

वचन आज त्या भारतभक्ता
राष्ट्रप्रिय नेहरुजींना कीं
प्रिय आम्हां तुम्हि लोचनांहुनी
म्हणुनी राहूं सुसज्ज तत्पर
अपुल्या एका भृकुटीपातें
प्राणपणानें जिंकुनि हिमनग

अर्पू अपुल्या प्रिय चरणांतें
चोरांच्या भुरट्या टोळीनें
लपतछपत अंधारीं यावें
गाइगुरांना पळवुन न्यावें
आवाहन युद्धाला द्यावें

तसाच आला शत्रु अचानक,
इथले कपडे, तिथला नारळ
पळवावा कोणाला नकळत
हलवावे वा दगड खुणेचे

सत्ता शेतावरतीं सांगत
तशीच आली धाड शत्रुची
करीत कपटी सीमोल्लंघन
वणव्यासम नाचवीत पलिते
घुसत राहिला लाज सोडुनी
पण आमुच्या शूरांच्या पुढतीं
दमला, नमला, भ्याला भ्याला
गेला तप्त रणाला त्यजुनी !

पाहुनि अमुच्या वीरश्रीला
सूर कसा अवचित पालटला !
युद्धशान्तिची करुनि गर्जना
कपटनाटकीं नायक झाला,
मेषाच्या पांघरून वेषा
शृगाल फसवूं पाहि जगाला !

आगमनाचे कारण पुसतां
स्वस्थ बसे हा मिटून ओठ
बडगा बसतां पाठीवर पण
घोळवीत आला शेपूट !

हल्ला करण्या या गनिमावर
हिमालयाला भ्रष्टविणाऱ्या
चला बन्धुनों ! रणधीरांनों
धृष्टपणाला नष्ट कराया
आण मिठाची आज तुम्हांला
आण घराची अन् वस्त्राची
भरती येऊं द्या सैन्याला

मस्ती येऊं द्या सिंहाची
सिंह ध्वज पेलण्या सिद्ध व्हा
शौर्याचा अन् धीरत्वाचा
खुशाल चढुं उत्तुंग हिमालय
गातिल गाथा शतके पुढचीं
गातिल गाथा शतके पुढचीं !



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि: ........

# उद्‌बोधन

मूळ तेलगु कविता : विश्वनाथ सत्यनारायण
अनुवाद : संजीवनी मराठे

उठा वीर हो ! पुढें सरा
काळ वेळ ही पूर्ण ओळखा या सरसावुनि त्वरा करा
हा अपुला उत्तुंग हिमाचल–देवगणांचे प्रिय वासस्थल
मृत्युदृष्टि . ही–अग्निवृष्टि ही
आज तयावर करिती त्यांचा निकराने प्रतिकार करा !

शिरिं चंद्राकृति फुलें माळुनी–गौरीहर विहरति सायंतनिं
भ्रष्टविण्या तो सत्पथ येतो
चोर कुणीसा उद्धट त्याला उंबऱ्यात अडवुन धरा !

पवित्र आश्रम बदरिवनांतिल–तापस यांत्रिक गिरिगव्हरांतिल
त्या अवमानित भीषण अनुचित
क्रूरकर्म जे करिती त्यांचा बाहुबले निःपात करा !

लक्ष्मीचें माहेर हें जसें–दक्षिणदेशा शांति देतसे
जिथें शाक्यमुनि धर्म आचरी
दिव्य पटीं त्या कोण मलिनमति आज ओढितो कृष्ण चरा

सुखलोलुप ही उदासीनता–सोडा निज भूमातेकरितां
आर्य तुम्ही तरि धरा शस्त्र करिं
ईश्वरीय जें तें रक्षाया मागे हटवा या असुरां !

इथें कुंडलिनि अखंड जागृत–लोकमानसा करि उद्‌बोधित
अजगरशी ही सोडूनि सुस्ती
क्रुद्ध होउनी धाव घ्या रणीं धुळीस मिळवा रिपुरुधिरा !
उठा वीर हो, पुढें सरा
उठा वीर हो, उठा..

१३८४०

# दुर्गंध

मूळ पंजाबी कविता : अमृता प्रीतम
अनुवाद : वसंत वऱ्हाडपांडे

अरे, मैत्रीच्या फुलांतून
रक्ताचा दुर्गंध आला,
विवेकाला भ्रम सुटला
सभ्यतेच्या.. संस्कृतीच्या
अंगावर घाम फुटला..
दांतातळी चावले ओठ
विश्वशांतीने हताश होऊन
एका मैत्रीच्या फुलातून
रक्ताचा दुर्गंध आला
हुंगला जो काळ्या निशेनें
उजळत्या दिवसाला बेचैन केले त्याने !

विश्वासाचा हा क्रूर खून
नसानसातून दौडत जाईल
धुळीचे घेऊन चुंबन
उगवेल.. भरास येईल
दर्वळेल त्याचा गंध
धान्यातून दडून बसेल
दर्वळेल त्याचा गंध
लेखणीला जडून बसेल..
इतिहासाच्या श्वासोच्छ्वासातून
हाच गंध येत राहील
आपणच केलेल्या जखमेची
सलती आठवण देत राहील.. !

इतिहासाच्या छातीवर
ही जखम कोरली जाईल

पाहताच ती, मानवता
लाजेने चूर होईल..
हेच रक्त मानवाच्या
हातामधून वाहते आहे
जखम ही मानवाच्या
याच हातावर होते आहे..!

तेच हे कोमल हात आहेत
फुलांसही जे फुलवतात
तेच हे प्रणयी हात आहेत
प्रियकरांस जे डुलवतात
तेच हे कलावंत हात आहेत
वीणेवर जे छेडतात गत
तेच हे कीर्तिवंत हात आहेत
जे स्वप्नांना बसतात विणत
पवन, पाणी अग्नि यांना काबूत आणतात
तेच हे हात..

सूर्याची पेटवून चूल
हेच हात अन्न शिजवतात
धरतीच्या चेहऱ्यावरील
झुलुपांना सावरु शकतात
शपथ फुलांची.. झुलुपांची तुम्हां
हातावर जखम नका हो करु!
हा कलावंत हात आहे
हातावर आघात नका हो करु!
बंधुनो, हातात हात द्या आता!
अशा हातांच्या रक्षणासाठी
आक्रमण करु पाहणारे हात
आपण पार मोडून टाकू
आघात करु पहाणारे हात
आपण पार तोडून टाकू..

● ● ●

# पीतज्वर

मूळ मल्याळी कविता : ओलप्पमन्ना सुब्रमण्यम् नंबुद्रीपाद
अनुवाद : म. ना. सरपटवार

कसेबसे जे करिती भोजन
उभ्याउभ्याने निद्रा घेती
लडाखचे हे शूर शिपाई
खडा पहारा देत जागती !
धन्य तुम्ही ही धन्य मायभू !

आत्मबलाते तुमच्या पाहुन
घाबरला रिपु अंतःकरणीं
अग्निज्वालापरी जाहला
तुम्हींच दाहक वातावरणी !
पाउल पुढती टाकायास्तव
यासाठी नच शत्रू धजला
प्रिय मित्रांनो ! पुलकित होऊन
कणकण मातीचा या सजला
पराक्रमाच्या कथा परिसतां
धन्य तुम्ही ही धन्य मायभू !

करीत आहो इथे प्रतीक्षा
आम्ही तुमच्या आगमनाची
ओणम उत्सव घडवूं मंगल
धूळ लाभता वीरपदांची !
विजयी होऊन याल तेधवा !

मन्नारघाटचा रहिवासी हा
एक अंकिचन मी असताना
निरखित होतो लडाखात कशि
मनारची सीमा भिडतांना !

अन्नब्रह्म साकार तुम्हांस्तव
अनंत आकाशातुन होई
कृतज्ञतेने प्रमुदित होऊन
तुम्हां जाहली एकच घाई

क्षुधा तृषा ही तुम्हां न सुचते
नजरेपुढती शत्रुच दिसतो
सिद्ध व्हावया युद्धासाठीं
धीर न क्षणभर तुम्हां राहतो . .

क्षुधा न तुमच्या नजरेपुढती
आक्रमकांची सेना केवळ
पीतज्वरसा जिला जाहला
साम्राज्याचा मोह अनावर !
गडबड घाई युद्धास्तव ही
धन्य तुम्ही ही धन्य मायभू !

थंडीचा हा इथे कडाका
चादर घेता जरा ओढुनी
शत्रुहारिणी वीर चेतना
भरून राहे अंतःकरणीं
विचारांस ती तुमच्या देई
तीच एकली किती शीघ्रता !
थंडीची ना तुम्हांस दिक्कत
आक्रमकांशी जेव्हां लढता
धारातीर्थावरी वीर हो
धन्य तुम्ही ही धन्य मायभू !

कसे बसे जे करिती भोजन
निद्रा घेती उभ्याउभ्याने
लडाखचे हे शूर शिपाई
ध्येय साधिती आत्मबलाने
वीर पुत्र हें मायभूमीचे !

तुम्ही झुंजता आघाडीवर
अन्नावाचुन निद्रेविण वा
विचार तुमच्या मनी जागतो
दीपोत्सव मग कसा असावा ?
होळी ओणम पोंगल किंवा
कुठला येथे कसला उत्सव
विषाद उरतो उरात केवळ
तुमचा होतो जेव्हां आठव !
धन्य तुम्ही ही धन्य मायभू !

छातीवरती गोळ्या झेलुन
कोसळता तुम्ही धरणीवरती. .
मृत्युची ही थंडी भीषण
कुणी न तुमची चिंता करिती !

प्राणपणाने तुम्ही झुंजता
कराल काळासवे जेधवा
उत्साहाने येथे उत्सव
काय साजरा अम्ही करावा ?

हिमालयाहून उंच उंच तुम्ही
चढुनी हिमगिरि शिखरावरती
तुच्छ मानिता मरणांलागुन
अभेद्य मृत्युंजय ही माती !

मृत्युच्या छे ! मायभूमिच्या
कुशीत आम्ही इथे पहुडलो
एकमुखाने हेच सांगता
कळिकाळाला कधी न भ्यालो !

क्षमा करावी कविवचनांते
अशी न वाणी कधि ऐकिली
पुरुषोत्तम तुम्हि उदात्तता ही
कधि न कोठे कुणी पाहिली !

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

मधुर मधुरतर अतीव सुंदर
मिठी मारिता मरणालगुन
ओघळते जे रक्त तिथे ते
इथे उफाळे नसानसातून !
तप्त सागरापरी सदोदित..

तुमचा अंतिम श्वास पातला
वादळवारा होऊन येथे..
श्वासाने त्या अवघी जनता
मनीमानसी विचलित होते
परमेशाशी तुमचे नाते
धन्य तुम्ही ही धन्य मायभू !

पंचाधिक दश वर्षे झाली
भारतवर्षामध्ये यापरी
क्षुब्ध जाहला सागर आणिक
वादळवारे असे त्यावरी !

हृदयी जागृत आहे ज्वाला
सत्याग्रह जो घडला त्याची
आम्ही भारतभूचे नरवर
भयभीति नच कळिकाळाची !

तेच आम्ही जे शस्त्रास्त्रांविण
इथे झुंजलो साम्राज्याशी
शासन जेथिल अन्यायाने
पैज मारिते अंधाराशी
सूर्य तळपतो म्हणती ज्यावर !

गांधीजींनी प्रदीप्त केली
आत्मबलाची उज्ज्वल ज्योती
क्षणी त्याच निःशस्त्र असोनी
प्रकाश आम्हां दिसला भवती

Y 3275—3

तमोमयी ते शासन आम्ही
झुगारिले हे काय न ठावे ?

सीमेवरती उभे राहुनी
सदैव सावध तुम्ही असावे
उच्चरवाने एकदिलाने
स्वतंत्रतेचे गीतच गावे

इतिहासाची साक्ष एक ही
स्वातंत्र्याचे महाकाव्य हे
कविराया ! गा असा सदोदित
शत्रूंना दे आणि इशारा
मूर्तिमंत इतिहास सांगतो
कल्पनेस मग कुठला थारा
वैऱ्यांनो ! घ्या सावध ऐकुन—

अरे चिन्यांनो ! निर्घृण निष्ठुर
भ्रष्ट कराया इथली माती
भ्रष्ट मती जर तुमची होउन
पडेल आणिक पाउल पुढती !

अधःपात त्यामधेच तुमचा
विनाश सर्वस्वाचा होइल
पीतज्वर हा रूप मृत्युचे
धारण करूनी तुम्हांस नाशिल !

आज हिमाचल क्वचित कुठेतरि
तुमच्यापुढती जरा हालला
अथवा नमला आम्हांलागुन
असा तुम्हां जरि भास जाह्ला !

कालत्रयि तरि कधी न तिथल्या
सीमेवरचे वीर आमुचे
झुकायचे वा हटायचे हे
नीचा घे रे जाणुन इतुके !

●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम
विभाग वि:
क्रमांक नों. दि.

# कुणा कवीस

मूळ बंगाली कविता : कविता सिन्हा
अनुवाद : अनुराधा पोतदार

आज कुठें थरथरते भूमी
हादरते.. उन्मळते आंतुन
पिसाट गोळचा.. येती, घुसती
मातीमधुनी उसळे कण कण
दगडांचा अन् पडतो पाउस
कुणा इमानी भाळावरती
आज कुठे थरथरते भूमी..
आणि कांपते मेजहि माझे..

पहा.. पहा अन्
क्षमा असूं द्या,
कवितेलाहि दूर राहुं द्या
आज नको ती फोल भ्रमन्ती,
मृदु चरणांच्या चक्रामधुनी
छन्द नको.. यमकांचे बन्धन,
आज नको.. नादाचे नर्तन
पुन्हा कधी तरी! उजळ क्षणांतरी
आज नको हे.. सलते अन्तरी!

आज मोहरा फिरला अवघा,
आज शान्ति ही उरांत फुटली
घुसतां गोळी, दुभंगली अन्
भळभळत्या रक्तातुन न्हाली
आज शांतता उरांत फुटली!

मुक्या बापुड्या प्राण्यासम ही,
कुठें धांवता सैरावैरा
कुणी गर्जले, "सबूर ठैरो"
बघतां मागे, गमले तिजला,
'ही तर आहे साद मैत्रिची'
तोच ठाकली पिसाट गोळी
सुंसाट घुसली, अंगांगातुन,
आणि शांति ही उरांत फुटली !

इथे तिथे अन् अवघ्या ठायीं,
आज रणाची घुमते द्वाही
कुठें रंगली मैफल अवचित,
सप्तसुरांसह झाली स्तंभित,
चरणि कुणाच्या नूपुर खिळले
चिमण्या वदनी हास्यहि थिजले..

म्हणून कवीवर.. उठा उठा तर
या बाहिर अन् ऐका सत्वर
अर्ध चघळल्या, मउ शब्दांचे
आज नको ते चविष्ट चर्वण
आज कुठे थरथरते भूमी..
आणि कांपते मेजहि माझे..

दूर तिथे बघ, झुकली संध्या
शान्त तळ्याच्या कांठी लवली..
तिथे कुणाची सखी विचारी,
काय जाहले, आज असें हे..
आज हरवली वाणी आतुर
आणि प्रीतिची मुकी सारिका
काय जाहलें आज असें हें

तो गणिताचा छात्रच गंभिर
सोडवितां ते प्रमेय वदला,
ती प्रीती अन् अवघे सुंदर,
आज पडे ना, गोठुन, अडकुन..
या नियतीच्या कंसामधुनी
एकच उरले सत्य विदारक,
हे वणव्यासम युद्ध भयंकर..

आज कोवळ्या तरुण कवीला,
कॉफीमधली लज्जत नुरली..
रक्तवर्ण तो आज न सुंदर
स्मरतां कांहीं.. सलते अन्तर !
अशाच तेव्हां तुमुल रणांतुन,
उठला स्पेंडर, पेटुन, उसळुन,

अन् ऑडेनहि ! गेले धावुन,
कवितेलाही निरोप देऊन,
धगधगत्या त्या रणांगणावर..

रक्तकणांतिल आवाहन तें,
झेलित अपुल्या शस्त्रास्त्रांवर..
गेले धावुन रणांगणावर..

कां न तयाच्या तरुण बाहुतुन,
वीरश्रीचे वादळ खेळे,
कां न तयाच्या छातीमधुनी
आव्हानाचे उधाण उसळे
ते तर होते जीवन जळते
आणि इथे जगण्याची वळवळ

कलकत्त्याच्या आळीमधली,
गणिका कोणी निवान्त बसली..
पान चघळुनी.. पिंक टाकितां,
कशी शहारुन अवचित उठली..
(काय तिच्या मनिं आले भलते ?)

असेंच सांडे रक्त कुठेंसें
या मातीच्या कणाकणांवर
अन् आईच्या उरांत होते
जखम अशी ना रक्त भयंकर !
हेच तिच्या मनि आले अवचित,
शहारुनी अन् उठली जागृत.

पुरे ! पुरे हा शब्दच्छल हा !
हे नटव्या शब्दांचे नर्तन !
अन् हळव्या भावांचे रिंगण
ही न परवडे चैन फुकाची
सामान्यांना श्रमिक जनांना
धूळ—माखले चरण जयांचे
पहा रोवले या मातीवर !

कळलें सारें, आकान्ताविण..
घराघरांतिल त्या गृहिणींना !
कीं हें माथ्यावर आले सांवट,
रक्तपिपासू घोर रणाचे
अरिष्टातुन, मिळण्या मुक्ती
हवेंच व्हाया सिद्ध रणांतरी,
दान कराया सर्वस्वाचे
शान्त मनाने.. निर्धाराने !

सत्य भेटले क्षणात त्यांना..
बघा इथे पण, चित्र विलक्षण !
इतिहासाच्या जीर्ण दप्तरी
बसला रुतुनी पंडित कोणी..
सरसावित बाह्या, चिटचिटला,
‘हे तर बोलुन चुकला काळच !
इतिहासाची साक्ष महाशय
बोला, देऊ किती दाखले..

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ... दि.
विभाग ... नोंद दि.
क्रमांक
नों. दि.

बघा, प्रमाणें अस्सल बोला!
शक हुणांच्या अन् यवनांच्या,
अशा कितीदा आल्या फौजा
करीत गमजा, अवघी दैना,
उत्तर पश्चिम द्वारांतुन या
इतिहासाची साक्ष महाशय!

पुरे पुरे हे साक्षी-पुरावे
वर्तमान हा यांत बुरावे
आज हवे तर एकच उत्तर,
धगधगत्या या प्रश्नासाठीं
आज हवे तर एकच उत्तर..

आज घडीला कराल कांहीं?
कराल का रुधिराचे सिंचन?
इतिहासाच्या जीर्ण जगांतुन
उठाल का पण शब्दांवाचुन?
आज हवे हे एकच उत्तर..

खडबडुनी तो उठला आपुल्या
मृदुल मखमली.. स्वप्नांमधुनी
कुणी कवी अन् वदला कातर
दुःख व्यथेच्या वीणेवरचे,
कंपन हळवे आहे मी तर
या रणरणत्या खाओवरती
कशी रचावी कविता कोमल..

हिणवित म्हणतिल, मजला कोणी,
कवी न हा रे, हा कारागिर!
समरगीतांचे रचतो इमले
कवी न हा रे, हा सौदागर!

पुरे महाशय !

पुरे महाशय, तुम्ही कशास्तव
नांवहि घ्यावे समराचे तर ?
युद्ध न अडले तुमच्यावांचुन
रक्त न उसळे कढल्यावांचुन..

युद्ध लढुं द्या वीरांना त्या,
फक्त लेखणी द्यावी तुमची,
त्याहुन द्यावे काय दुजे तुम्ही
फक्त लेखणी–अन्य न कांहीं

बघा इथे पण ! चित्र विलक्षण !
पहा, इथे कुणि प्रतिभाशाली,
मेजावरती हात मारुनी
(हळुच दाबित दुखरी बोटें)
वदतो चेवुनी उच्चरवांनी
म्हणे, पेटल्या युद्धकथांनी,
उज्वल व्हावे, वाङ्मय अपुले
जिवंत व्हावे.. ज्वलंत व्हावे
(अक्षर वाङ्मय त्यास म्हणावे)
चिरंतनाच्या मूल्यांमधुनी
स्रवलेले ते वाङ्मय अक्षर !
आशय आणिक अभिव्यक्तीचें
तंत्रमंत्र तरि कुठले यांतुन..
(अक्षर वाङ्मय कुणी म्हणावे ?)
पुरे वल्गना ! पुरे घोषणा,
हे तर उघडे सत्य सदाचे..
सत्य भयानक माध्यान्हीचे
खपाटलेल्या पोटावरती,
आदर्शाचें वस्त्र न ठरते
आणि वीतभर खळगीमधुनी
ध्येयालाहि मुक्ती मिळते
पुरे वल्गना, पुरे घोषणा

कधी ऐकली, सांगा कोणी,
त्या युद्धाची मुकी कहाणी
स्मरते.. अजुनी, केविलवाणी
या विझलेल्या ज्वालांमधुनी !
त्या जर्मन युवतींचा झाला--
झाला सौदा.. हमरस्त्यातुन !
ठेवु नका, विश्वास जरी तुम्ही
चॉकलेटच्या चार वड्यांस्तव
काय तयांना नव्हती ओळख,
स्त्रीहृदयाच्या पावित्र्याची ?
सुस्थिर तुमच्या, घराघरांतुनि,
जगल्या त्याही सती म्हणूनी !
दिवस ठाकती तसे भयानक.. तसे विदारक !
येते चाहुल.. भीषण, दारुण !

चला सज्ज व्हा, करा त्वरा तर
सावध ! सावध ! आले दुर्दिन
चोर पाउली येती घेरित..
तेंच दुःख, तो विनाश आहे
दुर्दैवाचे चेष्टित विपरित
सावध ! सावध ! अडवा त्यांना
प्राणपणानें.. निर्धाराने..
अन् रक्ताच्या थेंबामधुनी
एक उठूं द्या, घोष लढ्याचा
मानवतेच्या संग्रामाचा
रक्त कढूं द्या रक्तासाठीं
उरांत फुटल्या शांतीसाठीं..

ऐकुं न ये कां व्याकुळ स्फुंदन
शेवटच्या श्वासांचे स्पंदन
कण्ठामधली घरघर दारुण
ही तर शांती, घुसतां गोळी,

कवळुनी चिमणे अर्भक वक्षी
रक्तहीन त्या अधरांनीं कां,
अखेरचा हा निरोप घेई ?

हाय ! हेंच कां होते संचित ?
अटळ विधीचें फसवें इंगित ?

किती रक्ताचे पाट वाहिले,
किती प्राणांचे हवनहि झाले...

शतकामागुन शतक उलटले
इतिहासाचे रंग न विटले

कितीकितींना गावी आरति,
कितीकांपासुन घ्यावी स्फूर्ति ?

अजुनी स्मरते, मस्तक लवते
बेचाळिसचे स्मरण न बुझते

परंतु आली, स्वतंत्रता ही
आली पुढती, उपायनासम !..

देवतरुंच्या मिरवित माळा,
आला दिन तो वैभवशाली

नवयुवकांच्या नयनांपुढती,
चित्रित स्वप्ने मुक्त जगाची !..

परंतु हंसले.. ऐकु न आले
दूर कुठेसे, खिन्न कसेसे

भवितव्याचे अभद्र भाकित,
कुणी क्षणी त्या होते सांगत !..

खूण एक ही असुं द्या चित्ती
जीवन अपुले बद्धच अन्ती

अभंग सत्यें, उग्र भयंकर
घेरित मानव्यास निरंतर !

हाय ! अश्रुचा लिहिता लेखच
सदा प्रीतिच्या भाळावरती . .

अन् मुक्तीचे कमलहि फुलते
रणीं सांडल्या रक्तावरती !

प्रचितीवांचुन कसे कळावे
या सत्याचे मोल विलक्षण ?
मोल विलक्षण देता उठते,
उजळुन अवघे, दुबळे जीवन !

इथे घराच्या उबेत आपण,
रस चर्चेमधि रमतो . . खुलतो,
आशय आणिक अभिव्यक्तीचे,
कसे चवीने चर्वण करितो . . .

परंतु सांगा . . सांगा सत्वर,
याच क्षणी जर आला श्रवणी,
आग ! आग ! हा पुकार दुरुनी
उठूच दचकुन, चोळित लोचन,
धावू सत्वर, अवघे पामर !
विझवावी मग आग कुणी ती ?

शब्दसृष्टिचा पढिक नियंता,
कवी बापुडा, टिकेल का तरि ?

प्राणभयाने पळेल तोही ?
करील काही ? देतां ग्वाही ?

तसाच, त्याहुन उग्र भयंकर,
आगडोंब हा येतो धुमसत ! . . .

जिभल्या चाटित, ज्वाला फेकित
वणव्यासम हा येतो पसरत . .

उत्तर सीमा जळते आता
सावध, सावध करा सिद्धता ! . .

खरेच शान्ती, उरात फुटली
घुसता गोळी, विछिन्न झाली !

आज कशाचे, वाद फुकाचे,
आज पडावे पाउल पुढती...
शान्त कराया क्षुब्ध धरित्री

आज ठरावा अपराधी तो,
राहिल थबकुन पाउल ज्याचे !..

शून्यामधले भ्रामक शोधन,
मूल्यांचे अन् नसते विवरण,
आसुसल्या भावांचे नर्तन,
स्वप्नरंजनामधले जीवन !
आज नको ते... आज नको ते
शब्दसृष्टिचा ईश्वर त्राता
प्राणकलेचा, मूर्त विधाता,

आज करावी क्षमा तमाने
दूर न लोटुन यावे त्याने
दिव्य आपुल्या स्वर्गामधुनी...

खरेच, आज न हृदयि विराणी
मुकीच गाणी... भाव कहाणी
कारण शान्ती उरांत फुटली
बसता गोळी, दुभंगली अन्
भळभळत्या रक्तांतुन न्हाली...

आज कुठें थरथरते भूमी
आणि हालते मेजहि माझें...

# शिपायाचा संकल्प

मूळ हिंदी कविता : रामधारी सिंह 'दिनकर'
अनुवाद : ग. दि. माडगूळकर

संगिनीच्या टोंकावर कसलें नवें स्वप्न वाहतो आहेस?
वीरा, कुठच्या नव्या सुगीचें बियाणें पेरतो आहेस?

दुर्दान्त दस्यूंना भाल्यांनीं भोसकतो आहोंत आम्ही
कृतांताच्या दाढांशी खेळ झुलवितो आहोत आम्ही

तशा कांहीं नाहींतच सांगण्या बोलण्याच्या गोष्टी
आम्ही तुटून पडतो आहोंत, स्वतंत्र राहण्यासाठीं

समोर देशमाउलीचा भव्य चरण आहे,
जिभेवर ज्वलंत असा एक 'पण' आहे

शत्रुचें मुंडकें कापूं, किंवा कापले जाऊं स्वतः
परंतु सीमेवरून परत फिरणें, नाहींच आतां

धगधगत्या कुंडांतून तीव्र निर्झरी उफाळून येईल
नगाधिराज रुंडमुंडांनीं भरून जाईल

रणचंडी मागेल, तें तें तिच्या पुढ्यात येईल...
मढ्यांवरून चढत चढत आमची सेना पुढें जाईल

पहिली तर आहुति आहे, यज्ञ असाच चालूं द्या
वारा लागुं द्या चेतलेला वन्हि अधिक चेतूं द्या

हृदय न हृदय जेव्हां अग्नीनें भरून जाईल
तेव्हां भारतातलें पाप पार निवून जाईल

मग पहाल प्रलय केवढा चंड असतो
खड्गधारी भरतखंड किती प्रचंड असतो

अगाध अंबुधी तळ आम्ही हातांनीं चाचपूं
मनांत आणूं तर, सारी धरणीच खाली दापू

आमच्या इषाऱ्यानें वादळें उभीं राहतील
आम्ही सांगूं तेथेंच मेघ गरजतील

जे असुर, आम्हांला सुर समजुन आज हंसताहेत
फसवे कोल्हे भुंकताहेत, साप डसताहेत

उद्यां ते कृपाप्रसादासाठीं हात जोडतील
भुवईकडे पाहून, दुष्टपणा–द्वंद्व सोडतील

गर्जा रे गर्जा, रणोच्चारांनीं अंबर भरा,
क्रोधांध कोलाहल करा, हाकारा, हुंकारा

ही आग, केवळ सीमेवरचे सांवट नाही
वेड्यांनो, हें स्वातंत्र्यावर संकट आहे

राष्ट्राच्या स्वाभिमानावर प्रहार झाला आहे
मातेच्या मुकुटावरच हा वार झाला आहे

वाटेल ते मस्तकीं पडो, आता डरायचे नाही
एकदां जन्माला आलो, दोनदां मरायचे नाही.

कुत्सित कलंकाची शिकवणुक विसरायची नाही
सुडावाचून विश्रांति आता घ्यायची नाही

वैऱ्याचे वैमनस्य विसरायचे नाही
जिवंत आहों तोंवर संतापाला सोडायचे नाही

गर्जा हिमालयाच्या शिखरावर, पठारांवर
गुलमर्ग, विंध्य, पूर्व-पश्चिम घाटांवर

भारतीय समुद्राच्या तरंगावर, भरतीओहोटीवर
गर्जा गर्जा गोपुरांवर, मिनारांवर, लाटांवर

खिडारांत, पडक्या वाड्यांत, खंदकांत
जान्हवी, नर्मदा, यमुना यांच्या तीरप्रदेशांत

कृष्णा, कंछार, कावेरी यांच्या परिसरांत
चितोड, सिंहगड यांच्या शेजारील मातीच्या थरांत

हुतात्मे झोपले असतील त्यांना हाक मारा
उठा नव्याने एकवार शिखा पिंजारा

गद्गद् हलवा उठवा त्या महान् निद्रितांना
हांका मारा साद घाला, चाणक्य-चंद्रगुप्तांना

आवाहन विक्रमाच्या असीलतेला, तेजाला
राणा प्रताप, गोविंद, बोलवा शिवाजीराजाला

बोलवा बोलवा विरागी वीर बंदाभाईला
हांक मारा मातोश्री लक्ष्मीबाईला

जन्मभर ज्यानें निंदेचा भडिमार सहन केला,
कंटाळूनच जो मायदेश सोडून गेला

अरे, अजून बोलताहेत आकांक्षा आंतिल
नेताजी आतां येतील, एवढ्यांत येतील

साहसी, वीर शौर्यरसानें झिंगलेला
बोलवा बोलवा तो आजाद हिंदसेनावाला.

शोधून काढा, टिपू सुलतान कुठे झोपला आहे ?
अश्फाक आणि उस्मान कुठे निजले आहेत ?

बाँब फेकणारे बहादूर कुठे झोपले आहेत
ते बलदंड भगतसिंगजी कुठे निजले आहेत ?

त्यांना सांगा, रागवूं नका, कृपा करा
चिडलेल्या ससाण्यागत पुनः अचूक झेप मारा

आता आम्हाला मान्य आहे, मान्य आहे
क्रांतिकाळातल्या साऱ्याच ज्वाळा
रक्ताच्या रंगाच्या असतात.

जागे पौरुष, पेटलेल्या वन्हीसारखे असते
शौर्य कोमल नसते, कराल असते

वास्तव जीवनाचे मर्म आम्हाला कळले आहे
आमचे पाप आम्हाला उमगले आहे

धर्माचा छळ म्हणजे काय तें समजलें आहे
बाँबची ताकद, विनयाची शक्ती दोन्ही समजलें आहे.

आतां आम्ही सहमत आहोंत
हुतात्मे अधीर होते, पेटुन उठलेले होते
त्यांचें वागणे नेकीचे होते
आम्हां विनयशीलाचे वर्तनच चुकीचे होते.

सांगा त्यांना, रागवूं नका, क्षमा करा
चिडलेल्या ससाण्यागत पुनः अचूक झेंप मारा

साधना स्वतःच करीं रक्त घेऊन उभी आहे
साबरमतीच आज सतलजला पुकारते आहे.

ते उठतील, सारा देश त्यांना अनुसरेल
आतां त्यांची हेटाळणी कोण करील ?

कोण खुळा आतां 'पिटका'ची पोथी उघडेल ?
निःशस्त्राच्या मुखातूनहि जयजयकारच पडेल.

जिचा सारा इतिहासच तप्त जळजळीत आहे,
वीरतेचा वैश्वानर जिची शीर न् शीर पाजळीत आहे

जिची असंख्यांत बाळे युद्धांत होरपळून मेली
शूल, संगिनी, अग्नि, यांच्याशी खेळून गेली

त्या जातीला दास कोण करील,
जिवंत आग हातात कोण धरील ?

केवळ कृपाणालाच नव्हे, त्यागाला, तपाला
साधनेला साद घाला, यज्ञाला, जपाला

गर्जा, ठिणग्या लहडलेली आग भडकवा
तपस्वी असतील त्यांना उठवा, जागवा

युगायुगांच्या ऋद्धि आज इथें उतरल्या आहेत
धर्माच्या लपलेल्या सिद्धी या ठिकाणी सिद्ध आहेत

या साऱ्या पावकाकडून विजयी रणांगण घ्या
शर आणि शाप दोहोनाहि निमंत्रण द्या

चिंतकानो, चिंतनानेच खड्ग घडवा
ऋषीनो, कृषानु उद्दीपक मंत्र चढवा

योग्यानो, पावलें जीवनाकडे वळवा
बंदुकीनीच आतां तुमचा प्रकाश सजवा

असेल तेथून आम्ही तेज तेवढे घेणार आहोत
सारा भारत घेऊन रणांगणीं जाणार आहोत

पर्वतपती आमूलाग्र हादरला पाहिजे
शिवानें विध्वंसक तृतिय नेत्र उघडला पाहिजे

अशोकानें खड्गावर शत्रुशीर्ष तोलले पाहिजे
गौतमानेंहि आज विजयवचन बोलले पाहिजे.

ही शांतिगुंफा नव्हे, युद्ध आहे, रणांगण आहे
तप नव्हे, सारे जग आज शस्त्र-शरण आहे

ललकारत्या भारतापुढें प्रत्यक्ष मरण आहे
हे युद्ध जिंकूच जिंकू, हा आमचा पण आहे.



# देशवासियांना पत्र

मूळ हिंदी कविता : डॉ. शिवमंगल सिंह "सुमन"

अनुवाद : ग. दि. माडगूळकर

माझ्या देशवासियांनो,
पत्र लिहितो आहे तुम्हांला, मरणाच्या मैदानावरुन
गंगा यमुना आणि ब्रह्मपुत्रा यांच्या उगमस्थानाहून

मानवतेचे मूल्य, समूळ संपविण्यासाठी
उठला आहे अनाचार
सत्य प्रेम, निष्ठा,
याच्या मानदंडावर प्रहार
दोघांची लढाई नव्हे ही, शिवेपाठींचे नव्हे भांडण,
प्रश्न असा आहे,
विश्वशांती कुत्र्याच्या मरणानें मरणार
की जगणार ?
जीवनाची तत्त्वें समृद्ध करण्यासाठीं !
हें युद्ध नव्हे,
राम-कार्य आहे, आमच्या लेखीं

' समर मरण, पुनि सुरसरि तीरा
राम काज क्षणभंगु शरीरा, '

नांव काय सांगू दादा,
एका दीन विधवेचा मुलगा मी
उसासे आणि आंसू याच्या तोलावर
लालन पालन झालं माझं
दारिद्र्याशी झुंजत, जळत, होरपळत,
वाढलो कसाबसा

दुबळा विश्वास आणि करुणा यांच्या मोलावर
गांव ठिकाणा काय सांगू ?
भारतांतली सारी गांवें सारखीच दिसतात
गल्ली बोळ, बैलगाडी
गवताची झोपडी
शेताच्या बांधावर

सुगीसारख्या बहरणाऱ्या,
लेहेंग्याच्या लेखावर डोलणाऱ्या चुनड्या
सांजेच्या लाल रंगात न्हालेली
हंबरणारी गाय, वासराला चाटणारी

तीन दिवस झाले, या खंदकात पडून
आग, धूर, स्फोट, मरणाच्या सांवटांत
एक प्रहर झाला, वातावरण शांत आहे
शांति ? हिलाच सैनिक शांति म्हणतो,

नाहीं तर, कण्हण्याच्या आवाजानें, तडे पडतात कानांना
लांडग्याच्या दाढांचा दांडगा धाक
सारखा वटवटत असतो
बर्फाचे थरावर थर
सांचतात ओव्हरकोटावर
थंडीची हुडहुडी थेट भिडते हाडांना

उबेचे नांवच घ्यायचे . .
तर आईची ममता,
प्रेम-बावरी घरधनीण
त्यांना आठवायचें
कधीं पाखरांच्या किलबिलाटाबरोबर
खुदखुद हंसणे उमटते
तान्ह्याचें
खोडकर कान्ह्याचें . .

आईचे डोळे दिसतात डबडबलेले
कोसळते काळिज,
ग्रामपंचायतीचा रेडिओ, एवढाच त्याला आधार
मोडक्या माचावर पडून,
ती आभाळ न्याहाळते आहे,
अंगणाच्या मधोमध,
एक तारा झळाळून उठतो आहे !
कुणीतरी सांगा तिला,
माझ्या माथ्यावर तुझा आशिर्वाद आहे,
तुझे नांव घेतघेतच झुंजतो मी !
मांसमाजल्या गिधाडांची
पक्कड फोडतो आहे,
भयंकर घांव घालून
त्यांच्या चोंची तोडतो आहे.

तुझ्या दुधाची शपथ, घेऊन सांगतो आई
वीरमाता हे तुझे बिरुद, मी हरवणार नाही
आलो तर, मिठी मारीन कडकडून
तुझी पायधूळ मस्तकी लावीन, भारुन जाऊन..

तूं ग कोण ?
आई, शेजारी उभ्या उभ्याच
स्फुंदते आहेस ?
हुंदके देते आहेस ?
जळत जळत झरणाऱ्या मेणबत्तीगत
वादळांत हेलावणाऱ्या पिंपळाच्या पानागत
तूं नाही असे वागायचे,
काळिज इतकं कमकुवत करतात का कुणी
असल्या अवघड वेळी ?

या मंगल घटकेला असे अमंगल आसूं
अग ही पूजेची वेळ
चंडीचे दरवाजे उघडले आहेत

धूप आण, दीप आण, अक्षता आण
लाल फुले घे हातांत
ती रक्तबिंदूच्या शिंपण्यानेच उमलतात
एकट्याची अडचण नव्हे ही
साऱ्या देशावर संकट आहे
माझ्यासारखे सहस्त्रावधी
बलिदानासाठी पैजा लावताहेत इथं
असले महद्‌भाग्य
मोठ्या कष्टानं क्वचित मिळतं बाई !

अनुक्रम
विभाग
क्रमां

एक धडधड मलाहि घुसळते आहे,
नाहीसे होण्याआधी एकदा तुला भेटावं
रंगदार सिंदुरानं दुभंगलेल्या लाटांत
बुडावं, बुडून जावं
विचाराला अवसर नाही
वेळ बलिदानाची आहे
देशाच्या महान मुक्तीपर्वाचा
खेळ रंगात आला आहे.

माझ्यावर माया आहे ना तुझी ?
मग एवढंच कर लाडके,
आपल्या लेकरांना अनाथपणाचा अनुभव देऊं नको
ती मोठी होतील तेव्हां गर्व वाहतील
आपल्या वडिलांच्या नांवाचा.
पुनः पुनः रोमांच तरारतील त्यांच्या अंगावर
करुणामयी, आसूं आवर
परिक्षेची वेळ आहे, उजुतवाजु करुं नको.
स्त्रीजातीचे दैवच असे आहे
आंतल्या आंत जळणें, वर प्रसन्न हंसणें
माझ्या निश्चयाचे मोठेपण तू सांभाळ ना
आगीशी खेळणं शिकूं देत आपल्या बाळांना
पुढच्या पिढ्यांसाठी, हीच करु सांठवणी

शूरता, धीर, पराक्रम हीच नव्या युगाची त्रिवेणी
येइन येईन, खचितच येईन,
विजयी तिरंग्यासारखा फडकत येईन
अर्जुनाची प्रतिज्ञा जिभेवर नाचवित येईन
दीन ठरणार नाही,
पाठ फिरविणार नाही
आणीनच आणीन,
रणांगणाचा बहुमोल नजराणा,
देशगौरवाचे मुक्तिगान गात येईन.
या घडीला जळतो आहे,
पेटलेल्या बर्फशिखरांवर
अवसेचा अंधार तुडवित तुडवित गरजतो आहे
या अमर देशाच्या,
अचल सौभाग्याची अखंड ज्योत
माझ्या उष्ण रक्ताचे अचूक अर्घ्य देऊन
सांवरतो आहे.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा
अनुक्रम ... क्रमांक ... वि: ...

# बाळमूठ वज्रघाव

—वसंत बापट

जेव्हा सायंप्रार्थनेचे विरळ विरळ झाले सूर
शीड तुटके अजिंक्य जहाज जेव्हां गेले दूर दूर
तेव्हांपासून राजवाड्यात गर्दी तरी व्हावी किती
राजघाट बुडला तेथे आश्रमाची काय स्थिती

पंख तुटले पाखरांचे बुजून गेल्या निळ्या वाटा
हिरवळीवर विहरताना कुणाला सलला नाही काटा
काळी काळझोप आली पांढऱ्या शुभ्र कोषामध्ये
गाणी झाली भिगुळवाणी पगाऱ्यांच्या घोषामध्यें

पूर्वी मुंग्या माणसे झाल्या मग मुंग्या झाली माणसे
ज्याने त्याने बीज खाता कुठून यावी नवी कणसे
मुळुमुळू वहात होते मुळामधले निळे रक्त
पंधरा वर्षे भरती नाही ओशाळवाणी ओहोटी फक्त

तोंच वाजे भैरव शंख, तुतारीची तीव्र हांक
वादळ झाले वणवा आला ब्रह्मपुत्रा बेचिराख
झोपेवरती चूड पडली, संचिताचा चक्काचूर
उगवतीला सूर्यावरती लाल पिवळा गेला धूर

आभाळात धरणीकंप, हादरून गेले वतनी घर
तावदाने तडकून गेली, छप्पर पडते डोक्यावर
तोच कुठून स्वर आला अजून उशीर नाही झाला
अशुद्धाचा चिखल करून पूर्वेकडे भिंत घाला . .

कोणाचा हा क्षीण स्वर कानावरती येतो आहे
तोफा बंदुकांहून उंच आज्ञा कोण देतो आहे
प्रत्येकाच्या भात्यामध्ये कोणी भरला गरम श्वास
निखळलेल्या चक्रामध्ये एक हात झाला आंस . .

चंद्रमौळी घरांवरती ज्यांनीं ठेवली जळती चूड
त्यांना आता उत्तर एक - क्षमा नाहीं - सूड सूड
जितकी माणसें तितके वीर, कोण घेईल मागे पाय
स्वातंत्र्याच्या आकांक्षेला कोणी रोखूं शकेल काय

सह्याद्रीच्या वादळ वाऱ्या पैल जाऊन सांग खबर
थंडगार बर्फामध्ये ज्यांना हवी असेल कबर
तेवढीं भुतें पुढे या . . बाकी सारे चले जाव
कोपर ढोपर संगिन इथे, बाळमूठ वज्रघाव

REFBK-0013480
REFBK-0013480



९३४८०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों. दि: ..................
शाखा.

'उघडि नयन' हा रेंदाळकरांच्या वेचक १०१ कवितांचा संग्रह महाराष्ट्रीय रसिकांच्या सेवेस सादर करताना आम्हांस अतिशय आनंद होत आहे आणि अभिमान वाटत आहे. एक श्रेष्ठ शैलीकार म्हणून आधुनिक कवितेच्या इतिहासात रेंदाळकरांचे स्थान अत्यंत उच्च आहे. त्यांच्या प्रदीर्घ प्रकरणातील व स्फुट पद्यातील सरस व सुंदर कवितांचा हा संग्रह प्रथमच प्रसिद्ध होत आहे.

नागपूर विद्यापीठातील मराठी भाषा आणि वाङ्मय विभागाचे प्रमुख व महाराष्ट्राचे प्रसिद्ध रससिद्ध कवी आणि मार्मिक काव्यमीमांसक प्रा० भवानीशंकर श्रीधर पंडित यांनी मोठ्या आस्थेने व साक्षेपाने या संग्रहाचे संपादन केले आहे. प्रा० पंडित यांनी तीन तपे आधुनिक कवितेचे अध्ययन, अध्यापन व अनुशीलन केले आहे. त्याचा परिपाक त्यांनी केलेल्या रेंदाळकरांच्या चरित्रचित्रणात व कवितेच्या पर्यालोचनात उतरला आहे. शेवटी दिलेल्या टीपा प्रत्येक कवितेचे मर्म उकलण्यास साहाय्यक होतील. महाराष्ट्रीय रसिक या संग्रहाचे कौतुक करतील अशी आशा आहे.

* * *

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३२० शुक्रवार : पुणे २.